महाराष्ट्र शासन
नगरविकास विभाग
नगर परिषद प्रशासन संचालनालय
सातवा मजला, बेलापुर भवन, बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४
egovdesk.dma@gmail.com / desk7.dma@maharashtra.gov.in

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५**
**अंमलबजावणीची विशेष तपासणी करणेबाबत**

परिपत्रक क्र. नपप्रसं/ का-०८/ई-गव्हर्नंस/RTS/२०२३/२७८५
दिनांक: १९-०५-२०२३

वाचा - १. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम, २०१६
३. शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि. २३-०६-२०१५
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दि. ०४-०९-२०१७
५. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दि. २६-०८-२०१९
६. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१/प्र.क्र.१८०/नवि-२० दि. २९-०१-२०२१
७. शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ३०-०९-२०२२
८. शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक १५-१२-२०२२

शासनातर्फे दिनांक २८-०४-२०१४ पासुन राज्यात पात्र नागरीकांना विहित कालमर्यादेत लोकसेवा मिळाव्यात, या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ लागु करण्यात आलेला आहे. तसेच नगरविकास विभाग-२, महाराष्ट्र शासन यांचेद्वारे आजपावेतो येथील संदर्भ क्र. ३ ते ८ चे शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे कलम ३ अन्वये विविध ५७ नागरी लोकसेवा अधिसूचित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

२. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करणे ही सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची महत्वाची जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने ही जबाबदारी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे किती प्रभावीरित्या पार पाडली जाते, याची तपासणी होणे आवश्यक आहे.

३. त्या अनुषंगाने सन २०२२-२३ मध्ये राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची किती प्रभावी अंमलबजावणी केली, याचे सोबत दिलेल्या मुद्यांस अनुसरुन मुल्यमापन करण्यासाठी आपले जिल्हातील नगरपरिषद/नगरपंचायतींचा कालबद्ध विशेष तपासणी कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. सदर तपासणी पार पाडण्यास सर्व जिल्हा सहआयुक्त/उप आयुक्त यांना संबंधित जिल्ह्यासाठी सक्षम तपासणी अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

४. सर्व जिल्हा सहआयुक्त यांनी प्रशासकीय सोयीनुसार हे आदेश मिळाल्यापासुन दिनांक ३०-०६-२०२३ पर्यंत आपले जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांना प्रत्यक्ष भेट देउन खाली दिलेल्या मुद्यांनुसार विशेष तपासणी करावी. नगरपरिषद/नगरपंचायत यांचेद्वारे तपासणी दरम्यान प्राप्त माहितीची शहानिशा करावी व सादर करत असलेली माहिती अचुक असल्याबाबत पुरावे त्यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावेत. तद्नंतर सर्व नगरपरिषद/नगरपंचायतींचा एकत्रित तपासणी अहवाल जिल्हा सहआयुक्त यांचे स्वाक्षरीने प्रमाणित करुन या संचालनालयास दिनांक १५-०७-२०२३ रोजी पर्यंत न चुकता सादर करावा.

५. सन २०२३-२४ नंतरही दरवर्षी जुन महिन्यात अशा स्वरुपाचा तपासणी कार्यक्रम राबविण्यात यावा व त्यामध्ये गतवर्षी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ संबंधीत केलेल्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा व त्याचा अहवाल संबंधित वर्षाच्या १५ जुलैपर्यत या संचालनालयास सादर करावा.

सोबत - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ तपासणी मुद्द्यांचे सहपत्र

मा. आयुक्त तथा संचालक यांचे मान्यतेने,

(शंकर गोरे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,
जिल्हा सह आयुक्त/उपायुक्त,
नगरपरिषद प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय, (सर्व).

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग, मुंबई.
३. मा. राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, सर्व महसुली विभाग.

<u>प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव</u>

मुख्याधिकारी, नगरपरिषद व नगरपंचायत (सर्व).

न.प.प्र.सं. मुंबई यांचे परिपत्रक क्र. नपप्रसं/ का-०८/ई-गव्हर्नंस/RTS/२०२३/२७८५ दिनांक १९-०५-२०२३

सोबतचे सहपत्र

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंमलबजावणी तपासणी

### तपासणीदरम्यान सादर करावयाची माहिती

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th>आवश्यक माहिती व अभिप्राय</th></tr>
<tr><td>१.</td><td>संकीर्ण माहिती</td><td>नगरपरिषद/नगरपंचायतीचे नाव :<br>वर्गवारी (अ/ब/क/न.पं.) :<br>जिल्हा:<br>विभाग:<br>स्थापना वर्ष:<br>लोकसंख्या:</td></tr>
<tr><td>२.</td><td>अधिकारी/कर्मचारी यांची माहिती</td><td>मुख्याधिकारी यांचे नाव:<br>उपमुख्याधिकारी (कार्यरत नसल्यास कार्यालय अधिक्षक) यांचे नाव:<br>कार्यरत संवर्ग अधिकारी/कर्मचारी संख्या :<br>कार्यरत स्थानिक कर्मचारी संख्या :</td></tr>
<tr><td>३.</td><td>सर्व कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतुदींबाबत ज्ञान आहे का?</td><td></td></tr>
<tr><td>३.</td><td>अधिसूचित करावयाच्या ५७ सेवांपैकी (परिशिष्ट अ) किती सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत(संख्या)?<br>सेवा अधिसूचित केल्याचा पुरावा सोबत जोडावा.</td><td></td></tr>
<tr><td>४.</td><td>सेवा अधिसूचित केल्या गेलेल्या नसल्यास त्याची विस्तृत कारणे?</td><td></td></tr>
<tr><td>५.</td><td>किती लोकसेवा ह्या ऑनलाईन माध्यमातुन दिल्या जातात?</td><td><table><tr><th>अ.क्र.</th><th>सेवेचे नाव</th><th>ऑनलाईन पोर्टल</th></tr><tr><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>६.</td><td>अद्याप ऑफलाईन दिल्या जात असलेल्या सेवांची संख्या व कारणे</td><td></td></tr>
<tr><td>७.</td><td>आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये म.लो.ह. अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांसाठी प्राप्त/निकाली काढलेले/प्रलंबित अर्जांचा गोषवारा</td><td><table><tr><th colspan="2">प्राप्त अर्जांची संख्या</th><th colspan="2">पैकी निकाली काढलेल्या अर्जांची संख्या</th></tr><tr><td>ऑनलाईन</td><td>ऑनलाईन</td><td>ऑफलाईन</td><td>ऑफलाईन</td></tr><tr><td>(१)</td><td>(२)</td><td>(३)</td><td>(४)</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table><br><table><tr><th colspan="2">प्रलंबित अर्जांची संख्या</th><th colspan="2">निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी</th></tr><tr><td>ऑनलाईन</td><td>ऑफलाईन</td><td>ऑनलाईन</td><td>ऑफलाईन</td></tr><tr><td>(५)</td><td>(६)</td><td>(७)</td><td>(८)</td></tr><tr><td></td><td></td><td colspan="2"></td></tr></table></td></tr>
<tr><td>८.</td><td>अर्ज प्रलंबित असण्याची कारणे</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | मुद्दा | आवश्यक माहिती व अभिप्राय |
|---|---|---|
| ९. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवांची माहिती (सेवेचे नाव, कालमर्यादा, पदनिर्देशित/अपिलीय अधिकारी ई.) दर्शविणारी सनद नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दर्शनीय स्थळी व संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली आहे का?<br>*असल्यास, सनदेचा Geo-tagged photo व वेबसाईट वर अद्ययावत केल्याचा पुरावा सोबत जोडावा. नसल्यास, न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |
| १०. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांना सेवांविषयक माहिती देण्याकरीता व अर्ज भरण्यास /स्विकारण्यास सहाय्य करणेकरीता स्वतंत्र "आपले सरकार सेवा कक्ष" स्थापन करण्यात आलेला आहे का?<br>*असल्यास, कक्ष स्थापन केल्याचा आदेश व कक्षाचा Geo-tagged photo पुरावा म्हणुन सोबत जोडावा.*<br>*नसल्यास, न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |
| ११. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ व आपले सरकार सेवा पोर्टल बाबत स्थानिक स्तरावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे का?<br>(असल्यास त्याचे विवरण द्यावे उदा. प्रशिक्षणाची तारीख, विषय, उपस्थित प्रशिक्षणार्थी संख्या ई.)<br>*नसल्यास, प्रशिक्षण आयोजित न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |
| १२. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम, २०१६ मधील नमुन्यांनुसार प्राप्त अर्ज/अपील ईत्यांदीचे अभिलेखे ठेवले जातात का?<br>*असल्यास, त्याचे पुरावे सोबत जोडावेत.*<br>*नसल्यास, न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |
| १३. | नागरीकांना लोकसेवा व संबंधित सेवा देण्याकरीता आवश्यक ऑनलाइन पोर्टलची माहिती व्हावी, याकरीता केलेला प्रचार/प्रसार व इतर उपाय योजना<br>*बॅनर/होर्डींग/वृत्तपत्र जाहिरात/जिंगल्स/रेडिओ/मिरवणूक/जनसभा/लाउडस्पीकर घोषणा ईत्यादी. माध्यमांद्वारे जनजागृती केल्याचा पुरावा*<br>*नसल्यास, न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |
| १४. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता व नागरीकांनी ऑनलाईन सेवा जास्तीत जास्त वापराव्यात, याकरीता स्थानिक स्तरावर केलेली उपाययोजना<br>*असल्यास, त्याचे पुरावे सोबत जोडावेत.*<br>*नसल्यास, न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |
| १५. | ऑनलाइन सेवा देण्याकरीता पुरेसे IT Infrastructures उपलब्ध आहे का?<br>*नसल्यास, त्याची कारणे* | सुस्थितीतील संगणकांची संख्या :<br>इंटरनेट कनेक्शन संख्या व स्पीड :<br>प्रींटर्स ची संख्या : |

| अ.क्र. | मुद्दा | आवश्यक माहिती व अभिप्राय |
|---|---|---|
| १६. | आपले सरकार पोर्टल वापरासाठी सर्व लॉगीन क्रेडेंशियल्स महाआयटी यांचेकडुन प्राप्त करुन घेतले आहेत का? तसेच मुख्याधिकारी यांचे वैध HSM Certificate उपलब्ध आहे का?<br>*नसल्यास, त्याची कारणे* | Chief Officer HSM Certificate expiry date: |
| १७. | गट क नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या बाबतीत संचालनालयाद्वारे संगणक खरेदी करण्याकरीता देण्यात आलेल्या रु. ५ लाख अनुदानातुन संगणक साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे का?<br>*असल्यास, उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत व संगणक खरेदीचे GEM पोर्टल द्वारे वेतन केल्याचा पुरावा जोडावा.*<br>*नसल्यास, निधी अखर्चित राहण्याची कारणे* | |
| १८. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यामध्ये व लोकसेवांकरीता प्राप्त अर्ज निकाली काढण्यामध्ये असमर्थ ठरलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर काय कार्यवाही केलेली आहे (कारणे दाखवा नोटीस देणे, गोपनीय अहवालात प्रतिकुल शेरे नोंदविणे, वेतनवाढ रोखुन धरणे इत्यादी ), त्याचे विस्तृत विवरण<br>*असल्यास, त्याचे पुरावे सोबत जोडावेत.*<br>*नसल्यास, न केल्याची कारणे नमुद करावीत.* | |